ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# लोकगीत : स्वरूप आणि प्रकार

**सौ. वेदश्री विजय थिगळे, Ph.D.**

*एम.ए., एम.एड., पीएच.डी.; सहयोगी प्राध्यापिका, प्रपाठक, मराठी विभाग प्रमुख,*

*कर्मवीर शांतारामबापू वावरे महाविद्यालय, उत्तमनगर, सिडको, नाशिक : 8*

*Scholarly Research Journal's* ***is licensed Based on a work at*** *www.srjis.com*

मराठी लोकगीत हे ओवी, पदे, आख्यानपर गीत, किंवा गद्यात्मक असा आशय असलेली संक्षीप्त रचना स्वरूपाचे असते. निसर्गनियमित भाव असल्यामूळे त्यात स्वाभाविक नादलयीमुळे ताल निर्माण होतो आणि अवयव संचलन अस्तित्वात येते. मनात दाटलेलया भावनांना गाणे आणि नृत्याच्या रूपाने एक वाट मिळते. एकदा का नादयुक्त शब्दरचना स्फुरली की तिला तालबध्द अशा संगीताची किंवा वाद्याची साथ दिली जाते. त्यातील शब्दही मग कधी अर्थवाही होतात तर कधी कधी त्या शब्दांना अर्थ ही नसतो पण लयबध्दतेसाठी त्याची पुनरावृत्ती होत जाते.काही गीते काही जमाती नित्य नेमाने म्हणत असतात. लोकगीत म्हणजे ग्रामीण जीवन आणि संस्कृती तसे रितीरिवाजांचे प्रतिबिंब उमटविणारा एक प्रकारचा आरसाच आहे.

लोकगीताचा शोध ओल्डेनबर्ग याने तर भारतीय महाकाव्याच्या प्रारंभीच्या अवस्थेपासून घेतला आहे. महाकाव्यातील पाचांची भाषणे ही तर पद्यमय होती. त्यांना जोडणारे प्रसंग हे गद्यात्मक असायचे आणि कालसापेक्ष व लोकसापेक्ष ते बदलत गेलेले दिसतात. ब्राह्मण ग्रंथात,उपनिषदात, महाभारतात, बौध्द जातकात, जैण चूर्णिकात असे गद्य–पद्य मिश्रित स्वरूप आढळते.या ग्रंथातील संवाद सूक्ते हा ही प्राचीन लोकगीताचाच प्रकार आहे.

**लेकगीतांच्या व्याख्या**

- लोकगीत म्हणजे भावगीत अन् एखादी ललितकृती असून तिला चाल असते– अलेक्झांडर क्रॉप
- लेकगीते ही अकृत्रिम असतात आणि संगीताचे रूप घेवून जीवनात आनंद निर्माण करतात. ग्रीम

- लोकगीते हे लोकसाहित्याचा आत्मा.– श्री. ना.रा. शेंडे
- लोकसमुहाचे वाड्.मय अलिखित आणि मौखिक परंपरेने चालत आलेले संगीतमय गीत – स्टॅंडर्ड डिक्शनरी ऑफ फोक्लोअर
- शास्त्रीय नियमांची आणि विशेषांची पर्वा न करता सामान्य लोकव्यवहाराच्या उपयोगासाठी माणसे आपल्या आनंदाच्या उल्हासात ज्या वाणीचा सहज आणि छंदोबध्द आविष्कार करतात ते लोकगीत होय.– श्री. स.कृ.फडके
- सामाजिक मनाचा एकतानतेने केलेला गीतमय आविष्कार म्हणजे लोकगीत होय. यातून उत्सवपर भक्तीभावपूर्ण तल्लीनता निर्माण होते – वि. का. राजवाडे
- सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहजपणे मनोभावांची झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत होय – डॉ. चिंतामणी उपाध्याय.
- लोकगीत आमच्या ग्रामीण जीवनातील आचार विचार, सभ्यता, पौराणिक परंपरा जपून ठेवते –श्री शामचरण दुबे.
- अपौरूषेय वाड्.मय असलेल्या वेदांच्याद्वारे संस्कृतीतील सभ्यपणा, शिष्टाचार, मानवी जीवन कळते तसे ग्रामगीतांद्वारे आर्यांच्या पूर्वीच्या संस्कृतीचे दर्शन घडते.
- लोकगीत म्हणजे सामुहिक मनाचा भावनिक उत्कट आविष्कार होय.
- लोकगीते म्हणजे तत्कालीन लोकवाणी आणि जीवनाविष्कारपर गीत होय.
- विविध प्रकारच्या जातिवंत स्वरविलासांनी शिणगारलेले व अशिक्षितांनी कित्येक वर्षामागे रचले असतांनाही केवळ पाठांतराच्या बळावर पिढयान पिढया आपल्या नवनवोन्मेषशाली तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे भावगीत म्हणजे लोकगीत होय ' डॉ. सरोजिनी बाबर
- लोकगीत म्हणजे सामान्या माणसाच्या जीवनाची अभिव्यक्तीच होय.

❖ **लोकगीतांच्या प्रेरणा व स्वरूप –**

आपली पारंपरिक जीवनपध्दतीच अशी आहे की, ही लोकगीते मानवी जीवनाचा एक अपरिहार्य भाग झालेली होती. समाज मनावर दैववादाचा असलेला प्रभाव, त्यातून निर्माण झालेल्या किंवा केलेल्या अनेक रूढी, परंपरा आणि चालिरिती, लोकजीवनाचे आचार विचार, धर्माचा प्रभाव यातूनच लोकगीतांची निर्मिती झाली आणि लोकगीतांना विषयही मिळालेले दिसतात. परंपराप्रियता हा लोकगीतांचा अपरिहार्य असा भाग आहे. निसर्गाचा प्रभाव झेलत झेलत काही लोकगीते जन्माला येतात. कधी कधी नद्यांच्या पाण्याचा

खळखळाट,मेघांचा विजेसह, घोषणांसही चाललेला आकांडतांडव, वृक्षांच्या पानांची सळसळ, पक्षांचा किलबिलाट, प्राण्यांचे आवाज या सर्वांमधून एक नाद निर्माण होतो आणि लोकगीत जन्माला येते.असा नाद आणि त्याला दिलेली स्वर आणि सूरांची साथ आणि त्यांची आदिम बोलीतील शब्द या सर्वांमधून एक लोकगीत आकाराला येते.

लोकगीतींचे विषय हळूहळू निसर्गाकडून सामाजिक जीवना कडे आणि मग नंतर सांस्कृतिकतेकडे वळतात. पण हे सगळं एकटया माणसांच्या बाबतीत आणि समुहातही घडते. लोकगीताच्या प्रेरणा कधी वैयक्तिक तर कधी सामुहिक असतात. लोकगीत कधी कधी उत्सुकता,आश्चर्य, भीती, प्रेम, आनंद तर कधी दु:ख प्रकट करण्यासाठी निर्माण होते. अनेकदा एखादी व्यक्ती गीतासाठी किंवा त्याच्या सादरीकरणासाठी पुढाकार घेते मग तिला साथ देण्यासाठी समूह पुढे होतो. लोकगीत कोणी लिहिले हे सांगता येत नाही. कारण लोकगीताचा कोणी कर्ता नसतो. अशी गीते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असतात आणि पिढयान पिढया ती चालत राहतात. कधी त्यातील एखादे कडवे गळून जाते तर कधी एखादी नवी पिढी त्यात स्वत:ची भर ही घालते.

प्रा.फिलीप जॉर्डनांच्या मते लोकजीवनाची नाडी ओळखण्याचे अंतिम सामर्थ्य लोकसाहित्याच्या असल्याने मानवी जीवनाभिमुख राहून ते सतत चैतन्यमय,कायम जिवंत राहते. लोकसमाजाचे विचार, समजुती आणि कल्पना या सर्वांचा अंदाज लोकवाड्.मयावरून बांधता येतो. संपूर्ण समाजाची संस्कृती याच एका साधनामुळे आजमावताही येते. लोकसाहित्यातच लोकजीवनाचे, संस्कृतीचे आणि जीवन जगण्याच्या विविध पध्दतींचे दर्शन घडते.

श्री ना.रा.शेंडे यांच्या मते आदिसंतांनी शून्यातून नियतीच्या कलानुसार जीवन आविष्कृत केले नव्हे ते अलंकृतही केले, त्यांनी ध्वनी निर्माण केला आणि विकासाविषयी त्याला शब्दाकार दिला. शब्दात त्यांनी विविध भावरंग भरले. तरल कल्पकतेने शब्दाशब्दांची मधुर व प्रभावी जुळणी आणि नवरसांना त्यांनी लोकवाड्.मयाची सहजस्फूर्त उभारणी करून रंगरूपासह त्याचा अत्यंत मधुर गंध सर्वत्र दरवळविला.

प्रा. कुंजबिहारी दास यांच्या मते लोकगीते कधी जुनी होत नाहीत.ती सुसंस्कृत लोकांच्या जीवनाच्या चाकोरीबाहेर राहणा—या ,निसर्गाशी इमान राखणा—या संस्कृतीच्या प्राथमिक अवस्थेतील लोकांचा उत्स्फूर्त भावनांचा आविष्कार असतो.मराठीतील बहुसंख्य लोकवाड्.मय हे स्त्रियांनी निर्माण केलेले असल्यामुळे कमलाबाई देशपांडे यांनी त्याला 'अपौरूषेय वाड्.मय' असे म्हटले आहे.

लोकगीतांची रचना ही गाणा—याच्या सोईनुसार केलेली असते. यामध्ये आवृत्त होणा—या धृपदाला महत्व असते. हे कधी शब्दात्मक तर कधी एखादे अक्षर असते तर कधी नुसताच नादही असतो. याच्या

साहायानेच लोकगीताचे गायन होत असते. प्रारंभ धृपदाने करून ते सतत आळवूनही गायन संपते. पण ते इतके नादमय असते की आवृत्तीचा कंटाळा येत नाही. कारण या धृपदाचे आळवणं विविध त—हेचे असते. लोकगीत सामुदायिक पध्दतीने गातात. त्यातच त्याचे सौंदर्य दडलेले आहे. आशयात तर असतेच पण गायनात देखील सौंदर्य असते.

या रचना प्रादेशिक, सामाजिक, सांस्कृतिक व जातिनिहाय सापेक्ष असतात. यात लोकसंस्कृतीच्या प्रतिमा आणि प्रतिके असतात.ध्वनी, शब्द, रंग, रूप आणि गंध यांचा लोकगीतात आविष्कार  घडतो परंतु केवळ हा आविष्कार घडवूनच लोकगीत थांबत नाही तर त्यातून नाटय, नृत्य व संगीत कलांचीही निर्मिती करून, प्रतीके दर्शवून त्यांनी जीवनातील विविध पैलूंची रसोत्कट अभिव्यक्ती घडविते आणि आपल्या संस्कृतीची अस्मिता प्रकट करते असे यामुळेच श्री रा. चिं. ढेरे यांनाही लोकगीत आणि एकूणच लोकसात्यि हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन वाटते.  लोकसाहित्याचा एक प्रकार म्हणून  ते ग्रामीण, अलिखित पण उच्च, उदात्त व प्रभावी स्वरूपाचे अक्षर वाड्.मय आहे आणि प्राचीन काळापासून चालत आलेला भारतीयांच्या जीवनसंस्कृतीचा इतिहास आहे म्हणूनही त्याच्या अभ्यासाची आवश्यकता आहे.

लोकगीत हे आदिमानवाच्या उत्स्फूर्त भावनांचा संगीतमय विलास वाटते. असे पॅरीला वाटणे स्वाभाविक होते. प्राचीन काळाच्या मौखिक संहितेतून संहितेच्या सादरीकरणातून उभारलेल्या आणि निर्माण केलेल्या संस्कृतीचे, सामाजिकतेचे , कलांचे दर्शन तर घडतेच पण त्याचबरोबर त्याच्या रसोत्कटतेचेही दर्शन घडते की जे आजच्या लौकिकगीतातसुध्दा झिरपले आहे. मॅलिनोव्हस्की यांच्याप्रमाणेच पाश्चात्य शास्त्रज्ञ अन्डयू लॅग हे देखील म्हणतात की, ‘लोककथा आणि लोकगीत म्हणजे मानवजातीच्या प्रारंभ काळाचा इतिहास आहे व ते अधिभौतिक शास्त्रही आहे.’ मालतीबाई दांडेकर यांना तर या या साहित्यात प्राचीन विज्ञान आढळते. याचाच अर्थ आदिमानवाची विचारप्रणाली व तिची स्थित्यंतरे व नैसर्गिक चमत्कारांची पटतील अशी अद्‌भुत उत्तरे मिळवायची असतील, जुन्या मानववंशाची शाश्वत सत्ता तपासावयाची असेल आणि त्यांच्या कलांचा अभ्यास करायचा असेल तर लोकसाहित्याशिवाय पर्याय नाही.

डॉ. तारा भवाळकरांच्या मतेही मानवी जीवनाचा समग्र वेध घेतांना केवळ भूतकाळातील मृत अवशेषांचे पुरावे एका मर्यादिपर्यंत उपयोगी पडतात. ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख, नाणी यावरून फार तर तत्कालीन राज्यकर्त्यावर्गाची माहिती मिळू शकते.  पुरातत्वीय उत्खननातून मिळालेल्या साधनांचा एका मर्यादिपर्यंतच उपयोग होवू शकतो,  पण लोककथा, लोकगीते, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे हे शब्दसाहित्य सामान्य माणसाच्या मनातील भावनांची, विचारांची, धारणांची सूक्ष्मातिसूक्ष्म आंदोलने जतन करीत असते.

बदललेल्या भौतिक जीवनातील पडसाद या शब्दलोकसाहित्यात अगदी सहजपणे उमटलेले दिसते. त्यामुळे शब्दलोकसाहित्य लोकजीवनाचे, लोकमानसाचा व समाजशास्त्रीय अभ्यासाचे साधन ठरते.

परक्या संस्कृतीचा स्पर्शही न झालेले, अर्थाची ऐश्वर्यसंपन्नता देणारे, लोक व्यवहारांचा जिवंतपणा व कलात्मक आविष्कार असलेले लोकसाहित्यातील लोकगीत हे मराठी साहित्याचा अस्सल खजिना आहे. तो कधी जुना होत नाही अन् होणार नाही. त्याचा वेगवेगळया अंगाने, दृष्टिकोनानुसार अभ्यास होत राहिल यात शंका नाही.

## ❖ लोकगीतांचे वर्गीकरण

लोकगीतांचे वर्गीकरण करण्यासाठी नेमकया घटकांनी त्याचे वर्गीकरण करणे अशक्य आहे. पण तरीही काही घटक नजरे समोर ठेवून त्यांचा समावेश त्या त्या प्रकारात करणं आवश्यक ठरते. वर्गीकरणांचे घटक आणि लोकगीताचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. प्रादेशिकता– नागर,ग्रामीण,वनप्रदेशातील आदिवासी किंवा वन्य जमातींची गाणी

२. स्त्री–पुरूष –स्त्रियांची गाणी आणि पुरूषांची गाणी

३. लोकगीत गायक – ही गीते गाणा–या गायकांच्या प्रकारावरून वर्गीकरण. जसे पुरूष, स्त्रिया,बहुरूपी, तुंबडीवाले, भराडी, वासुदेव, पांगुळ, धनगरी वगैरे

४. वय आणि नात्यानुसार लोकगीत –लहान मुलांच्या संदर्भातील गाणी. जसे अंगाईगीते,बडबड गीते, तालगीत, मुलींच्या संदर्भातील गाणी म्हणजे झिम्मा, फुगडी, पिंगा, माडीचे गाणे, गौरीची गाणी, पद्यमय उखाणे, मुलांसाठी हुतुतू किंवा हमामाची नृत्यखेळ गीते,

५. स्माजजीवनानुसार लोकगीत – भराडी ,बहुरूपी, गोंधळीण वाघ्या मुरळी, पोतराज,धनगर, तुंबडीवाले, शेतकरी, कीर्तनकार, विधीनाटय सादर करणारे वगैरे

६. जातीयता – भिल्ल, मातंग, बेलदार, धनगर, ठाकर, भराडी, आदिवासी,कातकरी, कोकणा, वारली, कोरकू, तुंबडीवाले, गौंड, बंजारा जातीनुसार लोकगीतांचे वर्गीकरण करता येते.

७. विधीनुसार किंवा घटनांनुसार – समाजातील विविध विधींशी आणि घटना किंवा कार्यांशी लोकगीते जोडलेली आहेत. जसे गर्भधारणा,डोहाळे, अपत्य जन्म, बारसे, मुंज ,लग्न, मर्तिक, शेतीतील विधी, कुळधर्म, कुळाचार, गोंधळ, उपासना गीते, बालगीते, पोवाडे,. दुर्गाबाई भागवतांनी तर प्रणय गीते,विलाप गीते,स्त्रियांची गीते, पुरूषांची गीते, नृत्यगीते, विधी गीते,विनोदी गीते, श्रम गीते असे काही प्रकार पाडलेले आहेत.

८. काही उदाहरणं

- **बालकांची गीते — बडबड गीते, अंगाई गीते, तालगीते, नृत्यखेळ गीते**

१. अडगुलं मडगुलं सोन्याचा वाळा, बाळाला लावू या कपाळी टिळा.

२. अडगुलं मडगुलं सोन्याचं कडगुलं,रूप्याचा वाळाए तान्हया बाळा, तीट लावू.

३. इथे इथे बैस रे मोरा,धावू नको लांब तू रे चोरा,

४. इथे इथे बैस रे काउ,बाळ घालतंय जेवू,चारा खा, पाणी पी, आणि भुरकन उडून जावू.

५. आपडी थापडी गुळाची पापडी,धम्मक लाडू तेल पाडू,तेलंगीचं एकच पान,धर रे बाबा याचा कान.

६. इरिंग मिरिंग लवंगा तिरींग, लॉगा तीरचा डुग डुग राजा,गाई गोपी उतरला राजा.

- **स्त्रियांची गीते —**

  - श्रमगीते —जात्यावरची गीते, कांडण करतानांची गीते
  - विधीगीते — विवाह, डोहाळे, अपत्य जन्म, पाळणे, पाचवीची पूजा,बारसे, मुंज, सण,उत्सव,मृत्यू.
  - नृत्यखेळ — पिंगा, झिम्मा, फेर, फुगडी
  - सण—उत्सव आणि व्रत — मंगळागौर, होळी,नागपंचमी, हादगा, गणपती, नवरात्र, कुलदेवता तुळशी, हरतालिका, ज्येष्ठागौरी, ग्रामदेवता, वटसावित्री,भुलाबाई, इनाई, कानूबाई.
  - उपासना — देव, देवी आणि कुलदेवता बाबतची गाणी.

स्त्री गीते हा आपला साहित्यातील मोलाचा ठेवा तर आहेच पण तत्कालीन स्त्रीजीवनांचा आणि भावनांचा आरसा आहे. तिची जात्यावरची ओवी म्हणजे तिच्या कौटुंबिक जीवनाचे भावपूर्ण दर्शनच असते.त्यातून तत्कालीन समाजजीवन दर्शन ही घडते.तिचे सासरचे आणि माहेरचे जगणे ती अशा गाण्यांमधून मांडत जाते.तिच्या मनाची सारी स्पंदने लोकगीतातील स्त्री गीते झेलतात. लोकगीतांमधून स्त्रीजीवनाचे सामाजिक रूप पहावयास मिळते. तसेंच त्यातून स्त्री —समूह मनाच्या विविध मनोवृत्ती व भाव—भावना मांडलेल्या आढळतात. एकूणच स्त्री जीवनाच्या विविध अवस्थांचे प्रतिबिंब या लोकगीतांमधून पहावयास मिळते. स्त्रीजीवन हे लग्नापूर्वीचे आणि लग्नानंतरचे असे दोन टप्प्यात विभागलेले असते. या दोन्ही टप्प्यांमधून स्त्रीला आपल्या जीवनात अनेक भूमिका पार पाडावयाच्या असतात. आदिवासी भिल्ल जमातीच्या स्त्रियांच्या लोकगीतांमधून विविधता आढळते, या गीतांमधून महादेव व सूर्य या देवतांचा अधिक उल्लेख झालेला आहे. जलदेवता, आसरा, अग्नी, पर्जन्य व प्राणीदेवता हे विशय या लोकगीतांमधून येतात. आदिवासी

भिल्ल जमातीच्या लोकांची किंवा स्त्रियांची स्वत:ची अशी बोलीभाषा आहे व त्या बोलीभाषेतूनच ती आपली लोकगीते गातांना आढळतात. विधी म्हणजे विशिष्ट पध्दतीने केलेली तंत्रामंत्रात्मक क्रिया होय. याच हेतूने अनेक विधीगीते, देवदेवतांवर गीते व अन्य प्रासंगिकगीते म्हणजे लग्नविधीची गीते, कृषीविषयक गीते अशी लोकगीते असल्याचे दिसून येते.

व्रतांवर तर स्त्रीचा अधिक विश्वास किंवा ही व्रते तिला आत्मबळ देणारी आणि संकटांवर मात करायला सोपं करणारी वाटतात. खरं तर व्रत म्हणजे 'यातनात्मक सामर्थ्याने कामनापूर्ती करण्याचे माध्यम होय'. या व्रतांचा सुक्ष्म अभ्यास हा रविंद्रनाथ ठाकूरांचा भाउ अवनीन्द्रानाथ यांनी केला होता. ते म्हणतात की 'A Vrata is Just desire. We see it represented in the pictures, listen to echo in the songs and rhymes] witness it's reaction in the dramas and dances, in short the Vratas are but desires as sung, the painted desire, desire as among and living'

स्त्री हीच विश्वनिर्मितीचे केंद्र असून सर्जन करण्याची अलौकिक यातुशक्ती तिच्यातच असते हे आजही आपण मान्य करायला हवे. ती अनेक शोधांची जननी आहे. भूमी आणि तीचं जगणं यात फारसे अंतर नाही. कारण भूमी आणि सृजन यांचा अनुबंध हा पुरातन आहे. भारतीय संस्कृतीत झाडे, पशुपक्षी,दगड,माती, पाणी, सूर्य, अग्नी यांच्या भावभावनांचे मानुषीकरण केले जाते आणि त्यांना पूजले जाते. हा ही लोकगीतांचा गाभा आहे.

आदिवासी भिल्लांची पावरा भिल्ल' ही उपजात आहे. या पावरा भिल्ल जमातीत 'होळी' हा सण मोठया प्रमाणावर साजरा करतात. होळीची गीते, षेतीविशयक गीते पारंपारिक देवदेवतांची गीते ते आपल्या पावरी भिल्ल यो बोलीभाषेतून गातात. स्त्रियांना दागिन्यांची फार हौस असते, मंगल प्रसंगी किंवा सणावाराला या निरनिराळया अलंकारांवर म्हणजे गळयातले, हातापायातील दागिने या सर्वांवर आधारीत अशी लोकगीते स्त्रिया गात असतात.या सर्वच भूमिकांवर आधारीत अशी ही स्त्रीजीवनावरील लोकगीते आढळतात. काही उदाहरणे पुढील प्रमाणे—

१. आई मी लहान, केतकीचं पान, मामाले सांग मले कंबरपट्टा आण।
२. नवरी पाहू आले नवरदेव, बैसले पाट चंदनी,नवरी बाई जशी शुक्राची चांदणी।
३. नाच गं घुमा, कशी मी नाचू, सोनार नाही आला बांगडया नाही मला कशी मी नाचू?
४. किस बाई किस, दोडका कीस,दोडक्या फोड लागली गोड, आणिक तोड बाई आणिक तोड।

५. पाउस पडला, मोत्या पवळयाच्या धारा, सुगी आली घरा तिला धरा।

६. लेकीचा जल्म जसा बाभळीचा पाला,बया गौळण बोलती, धनी कोण कोणाचा झाला।

७. हात मी जोडीते उगवत्या सूर्या नारायणाला,आयुष्य मांगते माइया ग कंथाला ।

८. दुबळयापणाचा मला आता नाही घोर । ज्योतिबा माझा देव, येतो सपनी नि देतो धीर ।

९. वरतामधी वरत मी सोमवारचं केलं, पोटाला माइया गं महादेव बाळ आलं।

१०. शेजीबाई गुज सांगते गं तुला, भ्रतारावाचून गत आणि शोभा नाही गं नारीला ।

११. सासू आणि सासरा, देर हा तिसरा, ओव्या गावू भरतारा, ये रं बा रं विठ्ठला।

- **<u>पुरूषांची गीते</u>** –

  - श्रम गीते – भलरी गीते, गुराख्याची गाणी, मोटेवरची, नांगरावरची गाणी, सौंगणीची गाणी
  - विधीगीते – मृत्यू. जागरण, गोंधळ, आरती,
  - उपासना गीते – भगतांची गाणी, वासुदेव, पिंगळा, भराडी, पोतराज, जोगवे, वाघे, तुंबडीवाले, धनगरांची गाणी, बहुरूपी, बाळसंतोषाची गाणी, खंडोबा किंवा मल्हार–म्हाळसा आणि बानूची गाणी. गोंधळातील गाणी, जागरणाची गाणी, काही उदाहरणे.

१. भलरी दादा भलरी.....

२. धोंडी धोंडी पानी दे, धानकडा पीकू दे ।

३. गडयावरी गड रे बाबा गड चव–याचा भारी,येते डोळयाले अंधारी रे बाबा अंधारी ।

४. महादेवाच्या वाटेला,पोहा भक्तांचा चालला,महाशिरात्रीच्या दिशी. वृक्ष बेलाचा लावला आज अवतण घ्या उद्या जेवाले या,एक नमन गौरा पार्वती नि हर हर महादेव बोला ।

५. पहिले नमन पहिल्या गणा, दुसरे हनुमंताला, तिसरे त्रिभुवनाला, चौथे नमन रामचंद्राला ।

६. आली आली रे दिवाळी, दिवाळी, दिवा करजो भाताचा, चौक भरजो मोत्याचा ।

७. काटी काटी रे काटी,भराटीची काटी। नवरा बायकोचं भांडण झालं रं सुपारीसाठी ।

८. पाटलाच्या शेतामंदी बा पेरली रं सोप। जावई मागते घडी , मुंदी आणि गोप।

४. **लोककथागीते किंवा लोकनाटयपर गीते**

- गीतांच्या माध्यमातून सांगितलेल्या कथेस लोककथागीत असे म्हणतात.–जी.एल. किटरेज
- समाजातील आख्यान प्रभावी आणि प्रत्ययकारी स्वरूपात सांगून
- श्री गुमर यांनी प्राचीन (Oldest Ballads), कौटुंबिक (Ballads of kinship) अलौकिक (Ballads of Supernatural), पौराणिक, ( Legendary Ballads) , सीमांत(Border Ballads), आरण्यक (Greenwood Ballads) असे लोकथागीतचे वर्गीकरण केलेले आहे
- लोकसाहित्याचा अभ्यासक कीटरच याने दोन भागात लोककथागीतांचे वर्गीकरण केले आहे. एक लोकगायकांची गीत (Minstrel Ballads) आणि दुसरे पारंपारिक लोककथागीते (Traditional Ballads).
  - डॉ. प्रभाकर मांडे यांनी कौटुंबिक आणि सामाजिक कथागीत,पौराणिक कथागीते, भगतांची देवतांची कथागीते, शौर्यात्मक कथागीते असे वर्गीकरण केले आहे.

लोककथागीतांची परंपरा मौखिक आहे. यांचा कर्ता अनामिक असतो. यात आध्यात्मिक आशय रूपकाच्या स्वरूपात मा़ंडला जातो.यात कथानक असूनही गेयता असते आणि ते विशिष्ट संगीत वाद्यांचा आधार घेवून म्हटले जाते. यात काही चरणांची किंवा शब्दांची वारंवार पुनरावृत्ती होत असते. किंवा मागचा समूह ती करत असतो. लोकगथागीत गाणारा लोकगायक म्हटला जातो. त्याची गाण्याची आणि हेल धरण्याची विशेष अशी पध्दत असते आणि त्याची ती त्याने विकसित केलेली असते. उदा. आत्म्याला राघोचे म्हणजे शुकाचे किंवा पोपटाचे रूपक मानून एक लोककथागीत सादर होत असते.

आयेकून घे ,माहया सख्या,राघो उडून चालला
हिरवा ज्याचा रंग नाव जीवाजी पावला
नव महिन्यामधी पिंजरा तयार केला
तीनशे साठ सापळया जुळविल्या

सोळा बंदी त्यास लावले बहुत संगीन

पिंज—यामध्ये राघो राज करतो आनंदानं

शंभर वर्षाची मुदत त्याचा आकार ठरवला

हिरवा ज्याचा रंग नाव जिवाजी पावला.

❖ **लोकगीत मूल्यमापन**

लोकगीतातील मूल्यकल्पना त्या त्या समाजाच्या आणि संस्कृतीच्या साजेशाच असतात. तसेच सौदर्य कल्पना आणि भावरूपे ही जगण्याशी संबंधितच असतात. कारण लोकगीतांनीच त्यांच्या भावनांना आणि जगण्याला अमर केले आहे. ही लोकगीते जरी आनंदासाठी, विरंगुळा म्हणून किंवा मनोरंजन म्हणून किंवा श्रम हलके व्हावे म्हणून गायली जात असली तरी ती वाड्मयीन दृष्टया आणि मानवी संस्कृती संरक्षक म्हणून अत्यंत मोलाची आहेत. त्यातील सौदर्य मूल्ये, आकर्षक व चित्तवेधक अशी प्रतिमासृष्टी, प्रतीके , हृदयंगम आणि भरारी घेणा—या कल्पना आणि तत्कालीन वास्तवाचे दिलेले भान हे महत्वपूर्ण असतात. लोकगीताची भाषा ही जरी लोकव्यवहाराची असली तरी त्यात एक चैतन्य आहे. स्वत:चा नाद, स्वत:ची एक आंतरिक लय, शब्द, नृत्य आणि संगीत आणि समूह एकत्र करून सादर करण्याची एक पदधत आहे. लोकगीत हे तत्कालीन वास्तवतेचे आणि सामाजिक, सांस्कृतिकतेचे धन आहे. या संदर्भातील श्री हजारी प्रसादांचे मत मला अधिक महत्वाचे वाटते. कारण ते म्हणतात की ‘ लोकगीतांचे सारे महत्व केवळ त्यांच्या सौंदर्यापुरतेच मर्यादित राहत नाही तर आजवर जी विशाल संस्कृती जी विस्मृतीच्या समुद्रात बुडाली होती तिचे उद्घाटन करण्याचे मोलाचे काम या गीतांनी केले आहे’. म्हणून तर मग रव्रिद्रनाद्य ठाकूर यांनीही लोकगीतींचे वाड्मयीन आणि विवेचनात्मक असे मूल्यमापन केले आहे. दुर्गाबाई भागवत तर या लोकगीतांच्याच केवळ नव्हे तर अवघ्या लोकसाहित्याच्या प्रेमातच पडल्या होत्या. भला मोठा अभ्यासाचा खजिना त्यांना घावला होता असे म्हणता येईल.

लोकगीत कालसापेक्ष असा अवतार धारण करीत असते. कधी जुने लयाला जाते तर कधी नवीन उदयाला येते. कालसापेक्ष रचना, प्रतिमा, प्रतीके ,दैवते,रूढी, परंपरा आणि चालिरीती निर्माण होतात आणि त्याचा स्वीकार तत्कालीन लोकगीत आपल्या काळजात साठविले आणि शब्द,सूर,लय,नृत्य,नाद, संगीत, प्रसंग यांचा आधार घेवून ते

नव्या रूपात नव्या पिढीपुढे वावरत राहते.लोकगीतातून अनेक लोककला,लोकसंस्कृतीचे आदिम रूप आणि लोकजीवन प्रवाहित राहते.

माणसाचे जगणे हे काळाशी आणि कलांशी संबंधित आहे. त्यातूनच जीवनाचे प्रकटीकरण मानवाने केले आहे. कधी शब्दांमधून व्यक्त झाले तर कधी प्रत्यक्ष सादरीकरणातून. त्याचे हे सादरीकरणाचे वेड तसे भाषेच्या जन्मापासूनच्या आधीचेच. ते देखील समूहामध्ये समूहाच्या साहाय्याने तो सतत व्यक्त करत आलेला आहे. माणूस हा मुळातच समाजप्रिय प्राणी आहे. म्हणूनच माणूस हा स्वसंरक्षणासाठी समूहाने राहत आला आहे. माणसाने एकत्र राहण्यासाठी परस्परांमध्ये आदान—प्रदानासाठी आचार—विचार, पध्दती ठरवून घेतल्या. सामाजिक बांधिलकीचे नियम, शिस्तीचे नियम, नैतिक नियम, संघर्ष झाल्यास घ्यावयाच्या निर्णयाचे नियम, श्रध्दा, प्रकटीकरणासाठी देवतापूजन आले. आदर, वर्तनपध्दती वगैरे मानवाने हळूहळू निश्चित केले. यातूनच संस्कृतीचा उगम झाला. स्वसंरक्षण आणि रंजन यासाठी माणसाने कलेची आराधना संकेतातून, रेषाकृतीमंधून, कधी ध्वनींच्या आरोह अवरोहातून तर कधी साद—प्रतिसादांच्या निनादातून, कधी हावभावांच्या विविध आविष्कारांतून तर कधी वनस्पती, प्राणी यांच्या अवशेषांपासून तयार केलेल्या वाद्यांतून केलेली आहे. माणसाने सतत काही ना काही निमित्ताने आपल्या मनाची भाषा व्यक्त केली. मग ते निमित्त असो बाळाच्या जन्माचे नाहीतर एखाद्या लग्नाचे. अगदी कोणाचा मृत्यू झाला तरी त्याने ते दुःख कधी लोकगीतांच्या नाहीतर एखाद्या विधीच्या माध्यमातून मांडले. कधी कोणा एकाने तर कधी समूहाने. त्या कला ते संगीत निर्माण करून त्यांनी ते मौखिक पध्दतीने पुढच्या पिढीकडे संक्रमित केले. यात दर पिढीत काही समाविष्ट तर काही संपत गेले. काळानुरूप त्या कला, ते आविष्कार आकार घेत राहिले. पण आपले मूळ रूप त्या कलांनी, आविष्कारांनी कला जोपासणा—या लोकसमूहाने नष्ट होवू दिले नाही.

❖ <u>संदर्भ ग्रंथ</u>


१. *लोकसंस्कृतीचे उपासक — डॉ. रा.चि. ढेरे*

२. *लोकसाहित्याचे स्वरूप — डॉ. प्रभाकर मांडे*

३. *लोकरंगभूमी — डॉ. प्रभाकर मांडे*

४. *लोकमहाभारत जांभूळ आख्यान — स ुरेश चिखले*

५. *गोंधळ अर्थात जांभूळ आख्यान — गणेश हाके*

६. डॉ. सरोजिनी बाबर — जनलोकांचा सामवेद
७. संकलीत स्त्री गीते
८. लोकसाहित्य स्वरूप आणि शोध — डॉ. रा.चिं. ढेरे
९. लोकसाहित्याचे लेणे —मालतीबाई दांडेकर
१०. मराठीचा मोहोर — ना. गो. नांदापूरकर
११. अपौरूषेय वाड्.मय — कमलाबाई देशपांडे
१२. लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन — डॉ. पुरूषोत्तम कालभूत
१३. लोकसाहित्य दर्शन — संपादक, डॉ. आर. के. देवरे
१४. मराठी लोककथागीते — डॉ. दिगंबर कुळकर्णी
१५. प्राचीन मराठी गीत भांडार — ना. ग. जोशी
१६. मराठी लोकगीते — डॉ. सरोजिनी बाबर
१७. 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' — डॉ. प्रभाकर मांडे
१८. लेकसंचित डॉ.तारा भवाळकर
१९. लोकसाहित्याची रूपरेषा, प्रस्तावना. डॉ.दुर्गाबाई भागवत
२०. लोकसाहित्य संपदा — श्री न.रा.शेंडे
२१. लोकसंस्कश्तीची क्षितिजे, प्रस्तावना — श्री रा.चिं.ढेरे :
२२. लोकबंध — डॉ.अनिल सहस्त्रबुध्दे :
२३. लोक वाड्.मय : रूप आणि स्वरूप - डॉ. शरद व्यवहारे
२४. आदिवासींचे सण उत्सव - सरोजिनी बाबर.
२५. मराठीतील स्त्रीधन— डॉ.सरोजिनी बाबर